अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी नवीन संगणकीकृत ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्याबाबत-

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसटीसी-२०१६/प्र.क्र.८५/का.१०**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ३० एप्रिल, २०१६.

**वाचा-**

१) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा.क्र.२३).

२) महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३.

३) शासन पत्र क्रमांक एसटीसी-२०१४/प्र.क्र.१२६ (भाग-६)/का.१०, दिनांक १६.११.२०१५.

४) शासन पत्र क्र.एसटीसी-१०१०/प्र.क्र.६९/का.१०, दिनांक १०.१२.२०१५.

**प्रस्तावना-**

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून संदर्भाधीन अधिनियम २००० व नियम २००३ च्या अनुषंगाने अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येते. शैक्षणिक, सेवा, निवडणूक इत्यादी विविध कारणास्तव अर्जदार अथवा नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून अनुसूचित जमातीच्या अर्जदारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरिता संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे अर्ज करण्यात येतो. तपासणी समित्यांकडून सद्य:स्थितीत ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज स्विकारण्यात येतात. तर तपासणी समित्यांकडून त्यापुढील कार्यवाही ही मॅन्युअल पध्दतीने करण्यात येते. नागरीकांना विविध सेवा या ऑनलाईन मिळाव्यात हे राज्य शासनाचे धोरण आहे. त्यामुळे अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या तपासणीची कार्यवाही ही ऑनलाईन व्हावी तसेच अर्जदारास विविध टप्प्याची माहिती ऑनलाईन उपलब्ध व्हावी यासाठी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी नवीन संगणकीकृत ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर ऑनलाईन प्रणालीची अंमलबजावणी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

१. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज ऑनलाईन करण्यासाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या संगणकीकृत ऑनलाईन प्रणालीची अंमलबजावणी सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून दिनांक १ मे, २०१६ पासून सुरु करण्यात येत आहे.

२. सदर ऑनलाईन संगणकीकृत प्रणालीचे नामकरण **आदि 'प्रमाण' प्रणाली** असे करण्यात येत आहे.

३. सदर प्रणाली दिनांक १ मे, २०१६ पासून अंमलात आणण्यात येणार असल्याने त्या दिनांकापासून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठीचे सर्व अर्ज **आदि 'प्रमाण' प्रणाली** या ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारुन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठीचे अर्ज हे etribevalidity.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दाखल करुन नियमानुसार आवश्यक कागदपत्रे अपलोड करावेत. सदर संकेतस्थळावर अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अर्जाची सद्य:स्थिती, सुनावणीचा दिनांक इत्यादी बाबत सविस्तर माहिती अर्जदारास उपलब्ध करुन घेता येईल.

५. सदर ऑनलाईन संगणकीकृत **आदि 'प्रमाण' प्रणाली** द्वारे दिनांक १ मे, २०१६ नंतर तपासणी समितीकडे प्राप्त होणाऱ्या प्रकरणांमध्ये निर्गमित होणाऱ्या वैधता प्रमाणपत्राची शहानिशा संबंधितांना करता येईल.

६. दिनांक १ मे, २०१६ नंतर प्रमाणपत्र पडताळणीसाठीचा अर्ज अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून मॅन्युअल पध्दतीने स्विकारण्यात येणार नाहीत.

७. **आदि 'प्रमाण' प्रणालीच्या** वापरासंदर्भात अर्जदार व तपासणी समितीसाठी मार्गदर्शनपर मॅन्युअल तयार करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४३०१५५६१८९७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Laxmikant G Dhoke

Digitally signed by Laxmikant G Dhoke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Laxmikant G Dhoke
Date: 2016.04.30 15:59:05 +05'30'

**( ल.गो. ढोके )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
८. मा.अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा.अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
११.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
१२.सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली,
१३.सचिव, कार्मिक, लोकशिकायत तथा पेंशन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

१४.सचिव, जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
१५.मुख्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१६.कुल सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई/ पुणे विद्यापीठ, पुणे/ नागपूर विद्यापीठ, नागपूर/ अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद/ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, श्रीमती नाथीबाई दामोदरदास ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई/ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१७.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१८. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१९.सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे/पुणे/ नाशिक/औरंगाबाद/नागपूर/गडचिरोली/नंदुरबार/अमरावती
२०.सर्व विभागीय आयुक्त,
२१.सर्व जिल्हाधिकारी,
२२.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२३.सर्व उपजिल्हाधिकारी,
२४.सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल)
२५.सर्व तहसिलदार,
२६.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
२७.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य
२८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक
२९.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
३०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
३१.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
३२.प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर
३३.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
३४.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
३५.सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

३६.सह/उप सचिव/अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३७.सर्व कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.
३८. निवड नस्ती/का.१०.